सत्कार करण्यात आला.

# प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या एमबीए विभागात कौशल्य २०२२ कार्यशाळेचे आयोजन



अमरावती, दि. ३०: शैक्षणिक वर्ष २०२२ २३ च्या द्वितीय वर्ष एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी नुकतेच कौशल्य २०२२ कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या फायनल प्लेसमेंट च्या दृष्टीने संभाषण पब्लिक स्पिकिंग, इटिकेट्स व मॅनेरिसम , समूह चर्चा व प्रत्यक्ष मुलाखती यांचे प्रशिक्षण इंकड्स्टचे सुप्रसिद्ध प्रशिक्षक कार्तिक कुमार सर्टिफाईड सॉफ्टस्किल ट्रेनर यांनी दिले व विद्यार्थी ही वेगवेगळ्या उपक्रमात उस्फूर्त सहभागी झाले.

उद्घाटन पर भाषणांमध्ये महाविद्यालयाचे एमबीए विभागाचे विभाग प्रमुख प्रा. आशिष देशमुख यांनी आजच्या कोरोना नंतरच्या बदलत्या युगात शिक्षणासोबतच कौशल्य आणि क्षमता विद्यार्थ्यांमध्ये कशी वाढवावी लागेल याबाबतीत मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाच्या ट्रेनिंग ऑफिसर प्राध्यापक डॉ. प्रांजली देशमुख यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रशिक्षणाचे काय महत्त्व आहे याबाबतीत सविस्तर माहिती दिली. महाविद्यालयात वेगवेगळ्या कोर्ससाठी वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने कसे आयोजित करते याबद्दल विद्यार्थ्यांना अवगत केले. अध्यक्षीय भाषणामध्ये महाविद्यालयाचे टीएनपीचे अधिष्ठाता प्रा. डॉ. निक्कू खालसा यांनी गेल्या तीन वर्षांमध्ये महाविद्यालयाच्या वेगवेगळ्या डिपारमेंट मध्ये किती प्लेसमेंट दिले याचा सविस्तर प्रगती अहवाल विद्यार्थ्यांसमोर मांडला व यशाची हीच परंपरा कायम राहील याची विद्यार्थ्यांना ग्वाही दिली.

ही कार्यशाळा आयोजित करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. जी. आर. बमनोटे यांचे योग्य मार्गदर्शन व सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या करिअरमध्ये यशस्वी मार्गक्रमण करावे हीच सदिच्छा या शब्दात विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी चे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला. एमबीए विभागाचे ही कार्यशाळा यशस्वी आयोजित केल्याबद्दल अभिनंदन केले. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष ऍड.उदय देशमुख , कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख , सचिव श्री युवराज सिंगजी चौधरी आणि कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, शंकरराव काळे, प्रा. सौ रागिनी देशमुख, डॉ. वैशाली धांडे , प्रा. पूनम

चौधरी यांनी देखील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्षम कार्यशाळा यशस्वी करण्यामागे विभागाचे टीएनपी समन्वयक प्रा. युवराज वैद्य तसेच विभागाचे प्रशिक्षण अधिकारी प्रा. डॉ. अतुल खरड व सर्व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन समीक्षा मंगळे , आभार साक्षी देशमुख व अनुजा चिखलीकर यांनी मानले.

# मेघे संस्थान में कौशल्य कार्यशाला सफल

## एमबीए विभाग का आयोजन




**स्मार्टविदर्भ नेटवर्क,30 सितम्बर**

**अमरावती-** शिक्षा सत्र 2022-23 के द्वितीय वर्ष एमबीए छात्रों के लिए कौशल्य कार्यशाला का आयोजन किया गया था। दो दिवसीय कार्यशाला में फायनल प्लेसमेंट की दृष्टि से कौशल्य विकसित किया गया। पब्लिक स्पिकिंग, ईटीकेट्स, मैनेरिझम , समुह चर्चा, प्रत्यक्ष मुलाकात को विधि प्रशिक्षक कार्तिक कुमार ने सिखाई।

एमबीए विभाग प्रमुख प्रा.आशिष देशमुख ने अपने उद्घाटनीय संबोधन में कहा कि कोरोना के बाद बदलते दौर में शिक्षा के साथ कौशल्य व क्षमता बढाने का मार्गदर्शन किया।ट्रेनिंग ऑफिसर डॉ. प्रांजली देशमुख ने छात्रों को व्यावसायिक अभ्यासक्रम का महत्व समझाया। अलग-अलग कोर्स के लिए ऑनलाईन व ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया की जानकारी दी। प्रा.निक्को खालसा ने बताया कि तीन साल में महाविद्यालय ने प्रगती हासिल की है। सफलता की यह परंपरा कायम रखने का भरोसा लिया। उत्कृष्ठ आयोजन को लेकर प्राचार्य जीआर बमनोटे का संस्थाअध्यक्ष डॉ.नितिन धांडे ने अभिनंदन किया।इस अवसर पर एड. विजय देशमुख, प्रा.हेमंत देशमुख, युवराज चौधरी, शंकरराव काले, नितिन हिवसे, रागिनी देशमुख, वैशाली धांडे, पुनम चौधरी आदि ने भी कार्यशाला आयोजकों का अभिनंदन किया। समन्वयक डॉ.युवराज वैद्य, प्रा.अतुल खरड व उनके साथियों का विशेष अभिनंदन किया गया। संचालन समीक्षा मंगले, आभार साक्षी देशमुख व अनुजा चिखलीकर ने माना।